दिनांक 11/08/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 79

विषय – विटा नगरपरिषद आरोग्य विभागास एक संगणक व कलर प्रिंटर घेणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 04/08/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) आरोग्य विभाग यांचा दि. 31जुलै 2025 रोजीचा रिपोर्ट

3) मा. DMA कार्यालयाकडील संगणक Specification बाबतचे पत्र क्र. नपप्रसं/2022 - 23/नपा सहा अनुदान/का-5/4308, दि. 30 सप्टेंबर 2022

4) मा. DMA कार्यालय यांचे माहिती तंत्रज्ञान खरेदी कामीचे दि. 15 फेब्रुवारी 2024 रोजीचे आदेश

संदर्भ क्रं.1 मागणी अर्जानुसार आरोग्य विभागप्रमुख यांना दैनंदिन कार्यालयीन कामकाज करणे करीता त्यांना एका संगणकाची आवश्यकता आहे. सदर कामी संदर्भीय क्र. 2 अन्वये संगणक खरेदी कामी दिलेल्या आदेशानुसार प्रति संगणक 77,877/- एवढा दर हा i-5-10 th Gen करीता आहे. संदर्भ क्र 2 आदेश हा दिनांक 30 सप्टेंबर 2022 रोजीचा जुना आहे आज दिनांक 04 ऑगस्ट 2025 रोजी बाजारात किंमत कमी जास्त असू शकते.

संदर्भीय क्र. 3 अन्वयेच्या मा. नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांच्या माहिती तंत्रज्ञान खरेदी विषयक परिपत्रक नुसार सर्व खरेदी ही GeM पोर्टल वरून करणेची आहे. तसेच संदर्भ क्र 1 नुसार कलर प्रिंटरची मागणी करण्यात आलेली आहे. त्यास अंदाजे 30 हजार व संगणकास 1,00,000 असे एकूण 1,30,000 एवढा अंदाजित खर्च अपेक्षित आहे. तरी विटा नगरपरिषदेकडील आरोग्य विभागास GeM पोर्टलवरुन एक संगणक व एक कलर प्रिंटर खरेदी करणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 11/08/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 80

विषय- सन 2025-26 साठी दिव्यांग व्यक्तींना राखीव ठेवण्यात येणारा 5 टक्के निधी खर्च करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी विभागप्रमुख यांची दि. 05/08/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी

2) नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण/2015/प्र.क्र.118/नवि-20, मंत्रालय, मुंबई दि.28/10/2015

3) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रः-दिव्यांग-2018/प्र.क्र.52/18/नवि-28, दि.10/05/2018.

सन 2025-26 साठी दिव्यांग व्यक्तींना नगरविकास विभागाकडील संदर्भ क्रं.2 नुसार नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण/2015/प्र.क्र.118/नवि-20, मंत्रालय, मुंबई दि.28/10/2015 अन्वये दिव्यांगासाठी रक्कम खर्च करणेबाबत मार्गदर्शक सुचना देणेत आल्या आहेत. तसेच संदर्भ क्रं.3 नुसार नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रः-दिव्यांग-2018/प्र.क्र.52/18/नवि-28, दि.10/05/2018 अन्वये राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तीना दारिद्रय निर्मुलन योजनेअंतर्गत किमान 5% निधी राखीव ठेवणेत आला आहे. विटा नगरपरिषदेच्या सन 2025-2026 आर्थिक वर्षात अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद केली आहे. सन 2025-26 च्या आर्थिक वर्षात दिव्यांग नागरीकांना पेपर प्रसिध्दीद्वारे जाहीर आवाहन करुन त्यांचे मागणी अर्ज मागविणे तसेच मंजूर निधी दिव्यांग नगारीकांच्या उदरनिर्वाहकरीता मागणी अर्जानुसार त्यांच्या बॅक खात्यात NEFT/RTGS द्वारे प्रती लाभार्थी र.रू.4500/- प्रमाणे जमा करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 11/08/2025 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.81

विषय- विटा नगरपरिषद पाणी पुरवठा विभागाकडे मनुष्यबळ पुरवठा करणेकामी मुदतवाढ मिळणेकामी मक्तेदार श्री.गजानन रामचंद्र निकम यांचेकडील दिनांक 11/08/2025 रोजीचे दाखल अर्जावर निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी पाणी पुरवठा अभियंता यांची दि.11/08/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी

2) मक्तेदार श्री. गजानन रामचंद्र निकम यांचा आवक क्र.3047 दि.11/08/2025 रोजीचा अर्ज

सन 2024-2025 या वित्तीय वर्षाकरीता विटा नगरपरिषद पाणी पुरवठा विभागाकडे मनुष्यबळ पुरवठा करणे कामाकरीता मक्तेदार यांना जा.क्र.1683 दि.12/08/2024 अन्वये कामाचे आदेश देण्यात आलेला होता. सदर मनुष्यबळ पुरवठा करणे कामाचे मुदत संपत आलेली आहे. नगरपरिषद आस्थापनेवरील बरेच कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यातच पाऊसाळा सुरू झाले असलेने जल शुध्दीकरण प्रक्रियेत मनुष्यबळाची आवश्यकता आहे. याबाबत मक्तेदार श्री.गजाजन रामचंद्र निकम यांनी दिनांक 11/08/2025 रोजी सदर कामास मुदतवाढ मिळणेकामी विनंती अर्ज सादर केला आहे. तरी विटा नगरपरिषद पाणी पुरवठा विभागाकडे मनुष्यबळ पुरवठा करणेकामी पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेत येत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 11/08/2025 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र. 82

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील दैनंदिन संपूर्ण नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घरोघरी जाऊन घरगुती, वाणिज्य, शासकीय कार्यालय व शाळा वर्गीकृत घनकचरा संकलन करणे, रस्यांची झाडलोट करणे, शहरातील गटारी साफ करणे, औषध फवारणी करणे, नगरपरिषद हद्दीतील सार्वजनिक शौचालय साफ करणे इत्यादी संबंधित कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 07/08/2025 रोजी मंजूर केलेली टिपणी.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षणच्या दृष्टीने व शहरातील नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने घरोघरी कचरा संकलन करणे, रस्त्यांची साफसफाई करणे, शौचालये, गटर स्वच्छता करणे तसेच स्वच्छतेसबंधी विविध कामे करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने विटा नगरपरिषद हद्दीतील दैनंदिन संपूर्ण नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घरोघरी जाऊन घरगुती, वाणिज्य, शासकीय कार्यालय व शाळा वर्गीकृत घनकचरा संकलन करणे, रस्यांची झाडलोट करणे, शहरातील गटारी साफ करणे, औषध फवारणी करणे, नगरपरिषद हद्दीतील सार्वजनिक शौचालय साफ करणे इत्यादी संबंधित कामे करणे आवश्यक आहे. सदर कामाची मुदत दि.08 ऑगस्ट 2025 रोजी संपली असून त्यापुढे मान्यता न घेतलेस सदरचा खर्च हा न.पा. फंडातुन करावा लागणार आहे. तरी सदरचे काम स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उच्चतम कामगिरी करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनात्मक बक्षीस रक्कम / 15 वा वित्त आयोग अनुदान / नगरपरिषद फंड / इतर शासकीय अनुदानातून करणेकामी अंदाजपत्रक तयार करणे, तांत्रिक मान्यता घेणे, प्रशासकीय मंजुरी घेणे, निविदा प्रक्रिया राबविणेकामी तसेच सदर कामाची मुदत दि.08 ऑगस्ट 2025 रोजी संपलेली आहे. या कामास पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेत येत आहे.

सही/-

( डॉ. विक्रम बांदल )

प्रशासक

विटा नगरपरिषद विटा